**<u>ठळक बातम्या</u>**

- स्टार्टअप्स आणि कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातले उद्योजक एकत्रितपणे भारताचं उद्याचं भविष्य घडवतील, असं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- अपघातग्रस्तांना तातडीने रुग्णालयात पोहोचवणाऱ्या व्यक्तीला आता २५ हजार रुपये बक्षीस मिळणार

- राज्यातल्या महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगानं विविध राजकीय पक्षांचे विविध ठिकाणचे जाहीरनामे प्रसिद्ध

- सराफा आणि शेअरबाजारात घसरण

**आणि**

- ज्येष्ठ पर्यावरणवादी तज्ज्ञ डॉ माधव गाडगीळ पंचत्वात विलीन

**<><><><><><>**

स्टार्टअप्स आणि कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातले उद्योजक एकत्रितपणे भारताचं उद्याचं भविष्य घडवतील, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. येत्या फेब्रुवारी मध्ये भारतात होणाऱ्या 'इंडिया A-I इम्पॅक्ट समिट २०२६', या परिषदेच्या पार्श्वभूमीवर, प्रधानमंत्री मोदी यांनी आज नवी दिल्ली इथल्या त्यांच्या निवासस्थानी ए-आय, म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातल्या भारतीय स्टार्टअप्सची गोलमेज बैठक घेतली. त्यावेळी ते बोलत होते. 'ए-आय फॉर ऑल: ग्लोबल इम्पॅक्ट चॅलेंज', अशी या परिषदेची संकल्पना असून, त्यामध्ये सहभागी होण्यासाठी निवड झालेले १२ भारतीय 'ए-आय' स्टार्टअप्स आजच्या बैठकीला उपस्थित होते. हे स्टार्टअप्स भारतीय भाषा मॉडेल, ए-आय आधारित ई-कॉमर्स, विपणन, आरोग्य सेवा निदान, वैद्यकीय संशोधन यासारख्या विविध क्षेत्रांमध्ये काम करत आहेत.

**<><><><><><>**

अपघातग्रस्तांना तातडीने रुग्णालयात पोहोचवणाऱ्या व्यक्तीला आता २५ हजार रुपये बक्षीस मिळणार आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज दिल्लीत पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. सदर जखमी व्यक्तीला रोखरहित उपचार दिले जाणार असल्याचंही गडकरी यांनी सांगितलं. ते म्हणाले -

**बाईट - नितीन गडकरी**

केंद्रीय महामार्ग आणि परिवहन मंत्री नितीन गडकरी यांनी आज सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या परिवहन मंत्र्यांची वार्षिक बैठक घेतली. रस्ते वाहतुकीत सुरक्षा, प्रवाशांच्या आणि सर्वसामान्यांची सोय, व्यवसायानुकूल वातावरण आणि वाहनविषयक नियम अशा विविध विषयांवर बैठकीत चर्चा झाली.परिवहन हा विषय राज्य आणि केंद्राच्या समावर्ती सूचीतला असून त्यामुळे अशा प्रकारचा संवाद सक्षम, सुरक्षित आणि नागरिक केंद्रीत उपायांना पूरक ठरतो असं गडकरी यावेळी म्हणाले.

**<><><><><><>**

प्रगती या व्यासपीठामुळं देशातल्या पायाभूत सुविधांच्या अंमलबजावणीला गती आल्याचं प्रतिपादन माजी कॅबिनेट सचिव आणि नीती आयोगाचे सदस्य राजीव गौबा यांनी केलं आहे. आकाशवाणीला दिलेल्या विशेष मुलाखतीत त्यांनी ही माहिती दिली. प्रगतीच्या अंतर्गत आढावा घेतला जात असलेल्या काही प्रकल्पांची निवड खुद्द प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केली आहे. त्यात नवी मुंबई विमानतळ, चिनाब नदीवरचा रेल्वेचा पूल, आसाममधला बोगीबीळ पूल यांचा समावेश असल्याचं गौबा यांनी सांगितलं. आकाशवाणीच्या एफएम गोल्ड आणि इतर

वाहिन्या तसंच NEWSONAIROFFICIAL या युट्युब चॅनलवर आणि NewsOnAIR ॲपवर आज रात्री साडे ९ वाजता ही पूर्ण मुलाखत ऐकता येईल.

<><><><><><>

वीर गाथा 5.0 या उपक्रमात यावर्षी १ कोटी ९२ लाख विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. संरक्षण आणि शिक्षण मंत्रालयाच्या उपक्रमाअंतर्गत यंदा स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना भारताच्या सामरिक परंपरेवर व्यक्त होण्यासाठी विडिओग्राफीसारखी माध्यमं वापरायची अनुमती होती. देशपातळीवर निवड झालेले १०० विजेते यंदाच्या प्रजासत्ताक दिन सोहळ्यासाठीचे खास निमंत्रित असतील.

<><><><><><>

भारत निवडणूक आयोगानं येत्या २१ ते २३ जानेवारी दरम्यान, 'लोकशाही आणि निवडणूक व्यवस्थापन- २०२६' या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित केली आहे. त्याच्या पूर्व तयारीसाठी निवडणूक आयोगानं आज नवी दिल्ली इथं मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांची बैठक घेतली.

निवडणूक व्यवस्थापन आणि लोकशाहीच्या क्षेत्रातली भारतात होणारी ही आतापर्यंतची सर्वात मोठी जागतिक परिषद असेल. यामध्ये जगभरातल्या निवडणूक व्यवस्थापन संस्थांचे सुमारे १०० प्रतिनिधी सहभागी होतील.

<><><><><><>

महाराष्ट्रात महानगरपालिका निवडणुकीसाठीचा प्रचार जोमाने सुरु आहे. विविध ठिकाणचे प्रश्न लक्षात घेऊन वेगवेगळे राजकीय पक्ष निवडणूक जहीरनामे प्रसिद्ध करत आहेत. संबंधित महानगरपालिकांमधे येत्या १५ जानेवारीला मतदान असल्याने संबंधित क्षेत्रात सार्वजनिक सुट्टी जाहीर झाली आहे.

मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी वंचित बहुजन आघाडीने आज जाहीरनामा प्रसिद्ध केला. नवी मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी आज

भाजपाने जाहीरनामा प्रसिद्ध केला. पुढच्या वीस वर्षांत पाणी आणि मालमत्ता करात कोणतीही वाढ केली जाणार नाही, असं आश्वासन त्यात दिलं आहे.'कुंभ पर्वातली अमृत वचन' या नावाने भाजपानं नाशिक महापालिकेसाठीचा जाहीरनामा आज प्रसिद्ध केला. नाशिकला ग्रीन एनर्जी, सोलर उपक्रम, स्मार्ट डेटा-सिस्टम, ई-गव्हर्नन्स, क्लीन टेक्नॉलॉजी आणि हरित पायाभूत सुविधा देण्याचं आश्वासन त्यात आहे.

**<><><><><><>**

अमेरिकेकडून पुन्हा अतिरीक्त आयात शुल्क लादले जाईल, या भीतीनं देशातल्या शेअर बाजारात आज जोरदार घसरण झाली. दिवसअखेर सेन्सेक्स ७८० अंकांनी घसरुन ८४ हजार १८१ अंकांवर बंद झाला. निफ्टी २६४ अंकांची घसरण नोंदवून २६ हजारांच्या खाली जाऊन २५ हजार ८७७ अंकांवर स्थिरावला. धातू, तेल आणि नैसर्गिक वायू यासारख्या क्षेत्रातल्या कंपन्यांचे समभाग आज मोठ्या प्रमाणात घसरले. मुंबईच्या सराफा बाजारात चांदी आज किलोमागे १२ हजार रुपयांनी स्वस्त झाली. त्यामुळं जीएसटीसह एक किलो चांदीसाठी सुमारे २ लाख ४३ हजार रुपये मोजावे लागत होते. सोनं आज किलोमागे सुमारे ९०० रुपयांनी स्वस्त झालं. एक तोळा २४ कॅरेट तोळा सोन्यासाठी सुमारे १ लाख ३९ हजार रुपये आणि २२ कॅरेट सोन्यासाठी १ लाख ३६ हजार रुपये मोजावे लागत होते.

**<><><><><><>**

ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ डॉ. माधव गाडगीळ यांच्या पार्थिवावर आज पुण्यात अंत्यसंस्कार करण्यात आले. गाडगीळ यांचं काल रात्री पुण्यात निधन झालं. ते ८३ वर्षांचे होते. भारताच्या पर्यावरणविषयक संशोधन आणि संवर्धन धोरणाला आकार देण्यात त्यांनी मोलाची भूमिका बजावली. पश्चिम घाटातल्या जैवविविधतेचं संरक्षण

आणि संवर्धन करण्यासाठी त्यांच्या नेतृत्वाखालील समितीनं तयार केलेला गाडगीळ अहवाल महत्त्वाचा ठरला. प्रधानमंत्र्यांची वैज्ञानिक सल्लागार परिषद, राष्ट्रीय सल्लागार परिषद आणि राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणासह अनेक उच्चस्तरीय राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये त्यांनी काम केलं. २०२४ मध्ये, संयुक्त राष्ट्रांनी गाडगीळ यांना ‘चॅम्पियन्स ऑफ द अर्थ’ या पुरस्कारानं सन्मानित केलं होतं. त्यांना पद्मश्री आणि  पद्मभूषण सह राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरचे अनेक सन्मान मिळाले होते.

माधव गाडगीळ यांच्या निधनाबद्दल विविध क्षेत्रातल्या मान्यवरांनी तीव्र दुःख व्यक्त केलं आहे.

<><><><><><>

गुजरातमधे गांधीनगर शहरात पिण्याच्या दूषित पाण्यामुळे टायफॉईडच्या रुग्णांमध्ये लक्षणीय वाढ झाल्याप्रकरणी राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने राज्याच्या मुख्य सचिवांकडे नोटीस पाठवली आहे. दोन आठवड्यांत या प्रकरणाचा सविस्तर अहवाल मागितला आहे. गांधीनगर शहरात नव्याने बांधलेल्या पाणीपुरवठा करणाऱ्या वाहिनीत सांडपाणी मिसळल्यानमुळे रुग्णसंख्येत वाढ झाल्याचं उघड झालं आहे.

//<><><><><><>//